# स्टाइल गाइड

## लिंगाधारित लिंग निवड आणि सुरक्षित गर्भपाताचे प्रश्न यांच्याबाबत प्रसारमाध्यमांकडून वार्तांकन: प्रसारमाध्यमांसाठी मार्गदर्शक तत्वे

आयपास-पॉप्युलेशन फर्स्टने तयार केलेले मीडिया स्टाइल गाइड लिंगाधारित लिंग निवड (जन्मपूर्व केंद्रित)यांच्याबाबत तसेच प्रसारमाध्यमांमध्ये गर्भपाताच्या प्रश्नांबाबत वार्तांकन करणाऱ्या किंवा त्याचे चित्रण करणाऱ्या प्रसारमाध्यमांना सहकार्य करणारे साधन आहे. त्याचे उद्दिष्ट हे प्रसारमाध्यमांना लिंगाधारित लिंग निवडीचा प्रश्न स्त्रियांच्या सुरक्षित गर्भपाताच्या सेवेच्या हक्कावर गदा न येऊ देता हाताळण्यासाठी मदत करण्याचे आहे. लिंगाधारित लिंग निवड आणि गर्भपात यांच्याबाबत संवेदनक्षम, माहितीपूर्ण आणि समतोल साधून केलेल्या सादरीकरणामुळे खालील गोष्टींसाठी मदत होऊ शकते

- खोलवर रूजलेला लिंगाधारित हिंसाचार आणि भेदभाव यांच्याबाबत चर्चा करणे.
- स्त्रियांना सुरक्षित गर्भपात सेवा मिळतील याची खात्री पटवणे आणि
- प्रजन्न आरोग्याच्या कक्षेत सुरक्षित गर्भपातास मान्यता मिळवून देणे.

## परिभाषा

या प्रश्नावर योग्य चित्रण करण्याचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे योग्य परिभाषांचा वापर करणे हा आहे. गर्भपात आणि/ किंवा प्रसवपूर्व लिंग निवड यांच्याबाबत सोपी आणि केंद्रीत परिभाषांचा वापर केल्यामुळे गर्भपात आणि प्रसवपूर्व लिंग निवड टळू शकेल. तसेच, गर्भपात बेकायदेशीर आहे या समजाला तडा जाईल. भ्रूणहत्या किंवा हत्या अशा गंभीर शब्दांचा वापर केल्यामुळे स्त्रीच्या मनात आपल्या गर्भावस्थेबाबत किंवा गर्भाबाबत नकारात्मक विचार येतात आणि स्पष्टता नष्ट होते. लिंगाधारित लिंग निवडीच्या प्रश्नाबाबत विचार करताना स्त्रीच्या सुरक्षित गर्भपात सेवांशी संपर्कावर नकारात्मक परिणाम होणार नाही याची काळजी घ्यायला हवी.

### खालील संज्ञा टाळणे आवश्यक आहे

- स्त्रीभ्रूणहत्याः या संज्ञेचा नकारात्मक अर्थ आहे. तो हत्येसारखा वापरला जाणारा शब्द आहे. अनेकदा हा शब्द केवळ भ्रूणहत्या म्हणून वापरला जातो. तो गर्भपातावर ठपका ठेवतो.
- लिंग निवडीसाठी गर्भपातः लिंगनिवडीला गर्भपाताशी थेट जोडते आणि अनेकदा सर्व गर्भपात लिंग निवडीसाठी केले जातात असा अर्थ त्यातून काढला जातो. हा अर्थ अनेकदा चुकीचा ठरतो.
- हत्या/बळी- या अशा कठोर संज्ञा आहेत ज्यातून अत्यंत नकारात्मक भावना निर्माण होते. त्यामुळे भ्रूणाचे वैयक्तिकीकरण केले जाते आणि प्रजन्नाच्या संबंधित हक्कांच्या दृष्टीने हे अत्यंत परिणामकारक संवाद साधणारे नाही.
- न जन्मलेले बाळः या संज्ञेमुळेही भ्रूणाचे वैयक्तिकीकरण होते. हक्कांच्या दृष्टीकोनातून ही शिफारस करण्यात आलेली संज्ञा नाही.

न जन्मलेले बाळ अशासारख्या संज्ञांचा वापर भ्रूणासाठी करण्यात येऊ नये कारण त्यामुळे गर्भपात म्हणजे बाळाला मारणे असा अर्थ काढला जातो. याच कारणासाठी गर्भपाताला समानार्थी शब्द म्हणून भ्रूणहत्या, हत्या किंवा बळी असे शब्द वापरल्यामुळे गर्भपात ही गुन्हेगारी घटना आहे असे मानण्यास बळ मिळते. प्रत्यक्षात ते खरे नाही.

### सुयोग्य संज्ञा

- सुरक्षित गर्भपातः आवश्यक त्या सर्व वैद्यकीय साधनांची उपलब्धता असलेल्या आणि गर्भपात पार पाडण्यासाठी सरकारी मान्यता असलेल्या ठिकाणी कौशल्यपूर्ण व्यक्तीने केलेला गर्भपात.
- वैद्यकीय गर्भपातः शस्त्रक्रियेच्या सहय्यानी किंवा वैद्यकीय पद्धतीने एमटीपी कायद्या अंतर्गत दिलेल्या अटींनुसार केलेल्या गर्भपाताला ही संज्ञा वापरली जाते.
- गर्भावस्थेपूर्वी आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्रेः याचा अर्थ भ्रूणाचे लिंग ओळखण्यासाठी किंवा ठरवण्यासाठी वापरलेल्या पद्धती असा आहे. गर्भपूर्व लिंग निदान हे बीजांड मिळण्यापूर्वी किंवा मिळाल्यानंतरही केले जाऊ शकते. बीजांड रोवले जाण्याच्या टप्प्यात हव्या असलेल्या लिंगाचे शुक्राणू विविध प्रयोगशाळा तंत्रे वापरून वेगळे केले जातात आणि बीजांडाशी जुळवण्यासाठी वापरले जातात. इन व्हिट्रो फर्टिलायझेशन ही आपल्याला हव्या असलेल्या लिंगाचे बाळ मिळवण्यासाठी वापरली जाणारी एक लोकप्रिय प्रक्रिया आहे कारण या तंत्रात लिंग निवडीचे यश मोठ्या प्रमाणावर आहे. अल्ट्रासाऊंड तंत्रज्ञानाचा वापर हा रोपण झाल्यानंतरच्या टप्प्यातील सर्वाधिक सर्वसामान्य पद्धत आहे. कायद्याने भ्रूणाचे लिंग ठरवण्याची किंवा जाहीर करण्याची परवानगी नाकारण्यात आली आहे. तथापि अल्ट्रासोनोग्राफी हे एक नकारात्मक तंत्रज्ञान ठरू नये यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतात कारण निदानासाठी आणि विशेषतः गर्भावस्थेशी संबंधित गुंतागुंत ओळखण्यासाठी ती एक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.
- प्रसूतीपूर्व लिंग निदानः प्रसूतीपूर्व लिंग निदान ही गर्भपूर्व तसेच जन्मपूर्व वेळेत कोणत्याही पद्धतीचा, वैज्ञानिक किंवा अवैज्ञानिक तं त्राचा वापर करून लिंग ठरवण्याची किंवा ओळखण्याची घटना आहे.
- लिंगाधारित लिंग निवडः या संज्ञेद्वारे लिंग निवडीचे सामाजिक स्तर स्पष्ट होतात. त्यातून मुलीचा जन्म होण्यापूर्वी तिच्या प्रति होणाऱ्या कोणत्याही प्रकारचा भेदभाव दिसून येतो. त्यात प्रसूतीपूर्व लिंग निदानाचा समावेश आहे.

## रिपोर्टिंगसाठी टिप्स

### गर्भपात

- गर्भपाताचे स्थान- गर्भपाताच्या कायदेशीरपणाबाबत भारतातील स्त्री-पुरूषांमध्ये खूप कमी जागरूकता आहे. गर्भपाताबाबत चर्चा करताना असलेल्या ठपक्यामुळे त्यात गुंतागुंत वाढली आहे. माताआरोग्य, मातामृत्यू किंवा मुलांच्या लिंग गुणोत्तराच्या घटत्या प्रमाणाच्या घटनांमधून भारतात गर्भपात विविध अटींद्वारे कायदेशीर आहे हे सांगणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे कोणत्याही परिस्थितीत लिंगाधारित लिंग निवड बेकायदेशीर आहे हेही सांगायला हवे. याशिवाय एका प्रशिक्षित आणि प्रमाणित डॉक्टरकडून केले गेल्यास गर्भपात एक सुरक्षित वैद्यकीय प्रक्रिया आहे.
- गर्भपात आणि नैतिकता यांचा संबंध न जोडणे- एक स्त्री आणि तिचा जोडीदार विविध कारणांसाठी गर्भपाताचा निर्णय घेऊ शकतात. गर्भपात म्हणजे अनैतिकता नाही आणि असे संबंध जोडल्यामुळे गर्भपातावर तसेच गर्भपात करून घेणाऱ्या स्त्रीवर आणखी ठपका येतो. त्यामुळे गर्भपात बेकायदेशीर आहे ही भावना निर्माण होते आणि त्यामुळे स्त्रीला असुरक्षित गर्भपाताचा पर्याय निवडावा लागतो.

### लिंगाधारित लिंग निवड

लिंगनिदानाच्या चाचण्या कुठे आणि कशा केल्या जातात आणि त्याचे अहवाल कशा रितीने कळवले जातात, अशी तपशीलात माहिती देणे अयोग्य ठरेल आणि ती देण्यात येऊ नये. अशी माहिती मिळाल्यामुळे मुलगा हवा असलेल्या जोडप्यांना त्याचा फायदा होईल. पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत भारतात बेकायदेशीर काय आहे हे आपण आपल्या बातमीतून सांगू शकतो.
या संवादाचे मुख्य लक्ष हे काही भारतीय कुटुंबांमध्ये मुलींचे स्वागत का होत नाही यावर असावे. त्याचे कारण पितृसत्ताक मूल्ये आणि लिंगाशी संबंधित खोलवर रूजलेल्या भेदभावांमध्ये आहे. मुलाला प्राधान्य देण्याच्या संदर्भात, लिंगाधारित भेदभाव आणि लिंगाधारित हिंसाचार यांच्याबाबत लिंगाशी संबंधित भेदभाव आणि निवड करणे टाळता येऊ शकेल. तसेच मुलीचे महत्त्व आणि स्त्री आणि त्याचा परिणाम म्हणून भारतात मुलीचे अस्तित्व दाखवणाऱ्या लिंक द्यायला हव्यात.

### स्त्रियांना दोष देणे टाळावे

अनेकदा गर्भपातावर बातमीदारी करताना प्रसूतीपूर्व लिंग निदान, नवजात अर्भकाची हत्या किंवा नवजात बालकाचा त्याग यांच्या दरम्यान मुख्य लक्ष्य केले जाते ते आईला किंवा सासूला. मुलाला प्राधान्य हे अत्यंत मजबूत सामाजिक किंवा कौटुंबिक तणावामुळे येते. त्यात स्त्री-पुरूषांना अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावावी लागते.

6-Info-Kit-Style-Guide-Marathi_Print.pdf 2 04-07-2014 PM 12:29:54



**स्त्रियांना गर्भपाताची का गरज आहे याबाबत लोकांची जाणीव वाढवणे**
अभ्यासातून हे दिसून आले आहे की प्रत्येक स्त्री पुरूषांना गर्भनिरोधक सहजपणे उपलब्ध असली तरी गर्भपाताची गरज नक्कीच भासू शकते. दरवर्षी सुमारे ३३ दशलक्ष निरोधक वापरकर्त्यांना दरवर्षी गर्भपाताची गरज भासू शकते (डब्ल्यूएचओ २०१२). भारतातील अनेक स्त्रियांना निर्णय घेण्याचे हक्क नसतात. त्यातून त्या आपल्या लैंगिक आणि प्रजननाशी संबंधित निवड ठरवू शकत नाहीत आणि त्यांना गर्भनिरोधके आणि इतर आरोग्यसेवा सहजपणे उपलब्ध होत नाहीत. स्त्रियांचा आपल्या प्रजननाच्या अधिकारावर ताबा असावा याची खात्री पटवण्यासाठी गर्भनिरोधके आणि सुरक्षित गर्भपात सेवा साध्य होणे शक्य व्हायला हवे.

| गैरसमज किंवा दंतकथा | सत्य |
|---|---|
| गर्भपात बेकायदेशीर असून गुन्हा आहे | भारतात गर्भधारणा बलात्कारामुळे झाली असल्यास किंवा स्त्रीच्याअथवा बाळाच्या जीवाला त्याने धोका निर्माण होणार असल्यास आणि गर्भधारणा निरोधकाच्या अपयशामुळे झालेली असल्यास गर्भपाताला कायदेशीर परवानगी आहे. |
| गर्भपात हे गर्भधारणेपेक्षा जास्त असुरक्षित असतात. | योग्य प्रशिक्षित डॉक्टरच्या देखरेखीखाली गर्भपात करण्यात आल्यास तो अत्यंत सुरक्षित असतो. |
| दुसऱ्या तिमाहीतील गर्भपात बेकायदेशीर असतात | एमटीपी कायद्यांनुसार गर्भपात २० आठवड्यांपर्यंत कायदेशीर आहेत. तथापि एमटीपी कायद्यानुसार गर्भावस्था १२ आठवड्यापेक्षा जास्त असल्यास आणि २० आठवड्यापर्यंत असल्यास तो एका नोंदणीकृत डॉक्टरकडून कायद्यात नमूद केलेल्या पद्धतीनुसार केला जाऊ शकतो आणि त्यासाठी दोन नोंदणीकृत वैद्यकीय सेवा पुरवठादारांचा सल्ला आवश्यक असतो. |
| सर्व गर्भपात हे लिंगनिदानासाठी केले जातात | भारतातील २-४ टक्के गर्भपात हे लिंगनिदानासाठी केले जातात. (झा एट अल २०११.) एका विशिष्ट कालावधीत किंवा एका विशिष्ट परिसरात गर्भपाताचे प्रमाण वाढलेले दाखवणारी माहिती म्हणजे लिंग निवडीशी संबंधित गर्भपातांची वाढ असे गृहित धरले जाऊ नये. |
| अनैतिक गर्भधारणा होणाऱ्या स्त्रियाच केवळ गर्भपात करतात असे दिसते. | अहवालांमधून हे दिसून आले आहे की भारतातील विवाहित स्त्रिया सर्वाधिक गर्भपात करून घेतात. |
| गर्भपात आणि आय पिल्स एकच आहेत. | वैद्यकीय गर्भपाताच्या गोळयांचा वापर गर्भावस्था निश्चित झाल्यास ती काढून टाकण्यासाठी केला जातो. आपत्कालीन गोळयांचा वापर गर्भावस्था राहू नये म्हणून केला जातो. |

## मथळे तयार करताना

आपल्याला अनेकदा असे दिसून येते की अत्यंत संवेदनक्षम लेखांना सनसनाटी किंवा धक्कादायक मथळे दिले जातात. आपल्या मथळयातून लेखातील माहिती स्पष्ट होईल याची काळजी घेणे आवश्यक आहे. गैरसमज पसरवणारे आणि सनसनाटी मथळे दिल्यामुळे लेखातील सकारात्मक संदेश प्रदूषित होण्याची शक्यता असते. मथळे दिसून येणारे असे आणि आकर्षित करणारे असतात. त्यामुळे ते खूप लक्षात राहतात आणि त्यामुळे वाचकांच्या मनात केवळ मथळे वाचून प्रश्नांबाबत आपले मत निर्माण होण्याची शक्यता असते. स्त्रियांना दोष देणारे मथळे देणे टाळावे. उदा. आईपणावर धब्बा किंवा गर्भपाताची घटना गुन्हेगारी ठरवणारे उदा. जन्म न झालेल्या बाळाची हत्या किंवा नैतिक निकाल देणारे मथळे उदा. गर्भपात करू इच्छिणाऱ्या स्त्रीला अनैतिक किंवा पापी ठरवणे टाळण्यात यावे. सकारात्मक मथळयांमुळे गर्भपाताबाबत सकारात्मक विचार पोहोचतील आणि त्याच्याशी संबंधित ठपकाही कमी होण्यास मदत होईल.

चुकीच्या शीर्षकाचे उदाहरण ज्यामुळे बातमीतील सकारात्मक मजकूर नाहीसा होतो


गर्भपात के नाम पर बिक रही 'मौत' की दवा

Satyamev Jayate effect?

Madhya Pradesh acts against 65 Medical Termination of Pregnancy centres

## चित्रे

भाषेप्रमाणेच गर्भपाताच्या घटना सांगणाऱ्या चित्रांनाही तितकेच महत्त्व आहे. नाट्यमय चित्रे किंवा छायाचित्रांचा वापर टाळावा. उदा. पूर्ण दिवस भरलेले पोट किंवा रक्तरंजित, अत्यंत वाईट दिसणारे (गर्भपात झालेले) भ्रूण. त्यामुळे गर्भपाताचा संबंध क्रूर हत्येशी जोडला जातो. त्यातून नकारात्मक भावना निर्माण होते आणि या अत्यंत संवेदनक्षम प्रश्नाचे रूप बदलते.













## प्रसारमाध्यमांचे प्रश्न

कोणत्याची चौकशी किंवा स्पष्टतेसाठी कृपया संपर्क साधा: पॉप्युलेशन फर्स्ट आणि आयपास